संफौ. क्र. ६१२/२०१८
<u>नि. क्र. १७२</u>

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१**
शपथेवर सत्य निवेदन करते की,

**नाव** – **जरीना मैनोद्दीन जमादार**
**वय** – ४० वर्षे, **व्यवसाय**– शेती,
**राहणार** – मरसांगवी, ता. उदगीर, जि. लातूर.

**<u>अभियोग पक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी विधिज्ञ श्री. के. टी. उगलमुगले यांचेमार्फत शपथेवर सुरू.</u>**

मी मरसांगवी येथे लहानपणापासून राहते. दिनांक ३०/०९/२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजता काय घटना घडली, हे आठवत नाही. त्या दिवशी मी शेतात होते. आरोपींना मी ओळखते. ते माझ्या गावातील रहिवाशी आहेत. आरोपींनी मिरवणुक काढून माझ्या जागेत आले, असे काही घडले नाही. त्या ठिकाणी झेंडा फडकवून पुजा करून ती जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची नियोजित जागा असल्याबाबत बोर्ड लावला, असे काही घडले नाही. मी व माझ्या वडिलांनी बोर्ड लावण्यास मनाई केली, असे काही घडले नाही. आता मला **रेखांकित भाग–अ** वाचून दाखविला. त्याबाबत मला काहीही सांगता येणार नाही. मी आरोपींविरूद्ध फिर्याद दाखल केली होती. आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद तीच आहे. त्यावर माझी व माझ्या वडिलांची सही असून त्यातील मजकूर मला आठवत नाही. त्या सह्यांना एकत्रितपणे **नि.क्र.१७३** देण्यात येते.

**(सरकारी वकिलांनी केलेल्या विनंतीनुसार पुराव्याचा कायदा कलम १५४ अन्वये सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी आणि फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६२(१) नुसार पुराव्याच्या कायद्यातील कलम १४५ मधील पद्धतीने साक्षीदाराची विधाने खंडन करण्याची अनुमती दिली.)**

आरोपींना मी १० ते १५ वर्षांपासून ओळखते. घटनास्थळाच्या

जागेबाबत दिवाणी प्रकरण प्रलंबित होते. त्याचा क्रमांक नियमित दिवाणी दावा क्र.१५/२०१७ असा होता. तो दावा माझ्या वडिलांनी दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी अश्लील शिवीगाळ करून जातीय तेढ निर्माण होईल अशी परिस्थिती निर्माण केली होती. माझ्या वडिलांचे निधन झाले आहे. माझ्या वडिलांचे नाव आयनोद्दीन फकीर मोहम्मद गोलंदाज असे होते. त्यांचे निधन सहा ते सात वर्षांपूर्वी झाले आहे.

सही करण्यापूर्वी मजकूर मी तपासून पाहते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीतील मजकूर वाचून मी त्यावर सही केली आहे. आरोपींसोबत माझी तडजोड झाली आहे. आरोपींनी आमच्याविरूद्ध तक्रार दाखल केली होती. त्याकामी देखील तडजोड झाली आहे. आरोपीविरूद्ध माझी कोणतीही तक्रार नाही. प्रस्तुत प्रकरण बंद करण्यास माझी कोणतीही हरकत नाही. या प्रकरणात मला अन्य साक्षीदार तपासावयाचे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**
**उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञांनी नाकारला.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by KRISHNADEO ANKUSH YADAV
Date: 2026.04.07 18:06:41 +0530

**( के. ए. यादव )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२) उदगीर

दिनांक : ०७/०४/२०२६